**जनसंपर्क अधिकारी**
**पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय**
**रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

**प्रेसनोट क्रमांक :- २६१** **दिनांक :- २०/०९/२०२१**

# एम. डी. (मॅफेड्रॉन) नावाचा अंमली पदार्थ बाळगणाऱ्या दोन ईसमांवर अंमली पदार्थ विरोधी कक्षाने कारवाई करून १,१५०००/- रूपये किंमतीचा मुददेमाल केला जप्त.

मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयाचे अंतर्गत अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे पोलीस अधिकारी व अंमलदार हे नयानगर पोलीस ठाणेचे हद्दीत दिनांक १८/०९/२०२१ रोजी गस्त करित असतांना सायंकाळी १९.१५ वा. चे सुमारास मदिना हॉटेलचे समोर रोडवर एक ईसम दिसून आला व त्याची हालचाल संशयास्पद वाटल्याने त्यास त्याचे नांव विचारले असता त्याने त्याचे नांव अश्पाक चाँद पाशा वय २१ वर्षे, रा. रुम. क्र.२०४, सी विंग, चंद्रेश मनोहर बिल्डींग, लोढा कॉम्प्लेक्स, लोढा रोड, नयानगर मिरारोड (पुर्व) ता. जि. ठाणे असे सांगीतले. तद्नंतर त्याची अंगझडती घेतली असता त्याचे अंगझडतीमध्ये ५६,०००/- रुपये किंमतीचे एक पारदर्शक प्लॅस्टीक पाउचमध्ये १४ ग्रॅम वजनाचा मेफेड्रॉन एम.डी. नावाचा अंमली पदार्थ मिळून आला. सदरचा एम. डी. कुणाकडून आणला याबाबत विचारपूस करता त्याने नयानगर येथील एका इसमाकडून घेतला असल्याबाबत माहिती दिल्याने कानुंगो गार्डन परिसरात आदिल खलीकुल रहमान वय २५ वर्षे, रा. किणी कॉम्प्लेक्स, सी. ४०८, सेवन स्क्वेअर शाळेजवळ, टिवरी रोड, नायगांव (पुर्व), ता. वसई यास ताब्यात घेवून त्याची अंगझडती घेतली असता त्याचे कब्जात ४०,०००/- रूपये किंमतीचा १० ग्रॅम वजनाचा मेफेड्रॉन (एम.डी) अंमली पदार्थ व १९०००/-रु. रोख रक्कम मिळून आले. नमुद आरोपींविरुध्द अंमली पदार्थ कायदा कलम २०, २२(क), २९ नुसार गुन्हा नयानगर पोलीस ठाणे गुन्हा नोंद क्र. ।। ५१५/२०२१ प्रमाणे दाखल करण्यात आला असुन पुढील तपास नयानगर पोलीस ठाण्याकडुन चालु आहे.

सदरची कारवाई डॉ. श्री. महेश पाटील, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. रामचंद्र देशमुख सहा. पोलीस आयुक्त, (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे पोलीस निरीक्षक श्री. देवीदास हंडोरे, पो.हवा. २१८८. धनाजी इंगळे, पोना.२५४. पवन पाटील, पोशि.३४७२. अजय यादव, पो.शि.३२५८. ज्ञानेश्वर चव्हाण, पोशि. १२०४ घरबुडे व पोशि. ३०६९ ईश्वर पाटील यांनी केली आहे.

----oooo----